लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. ७ ऑक्टोबर २०२५

# शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत विवेकानंद दुहेरी विजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर शुक्रवारपासून सुरू झालेल्या मनपास्तर शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात विवेकानंद कॉलेजच्या संघाने दुहेरी विजेतेपद पटकावले. महानगरपालिका प्राथमिक शिक्षण समिती आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे या स्पर्धा सुरू आहेत.

१४ वर्षे मुलींच्या गटात अंतिम सामन्यात महाराष्ट्र हायस्कूलच्या संघाने ३-२ फरकाने श्री गुरूदेव विद्यानिकेतन संघावर मात केली. विजयी संघात अंतरा व्हरकट, आराध्या वाळवेकर, हीना मुल्ला, वृंदा शिंदे, रुद्राक्षी शिंदे, भूमिका पाटील, परिणिता यादव, ज्ञानेश्वरी पाटील, आराध्या लिगाडे, आदिती शिंदे, आकांक्षा पवार, यशस्वी राजमाने यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक संदीप पाटील, अभिजित राणे यांचे मार्गदर्शन लाभले.




कोल्हापुरात महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या मनपास्तर शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात विवेकानंद कॉलेजच्या संघाने दुहेरी विजेतेपद पटकावले.

१९ वर्षे मुलींच्या गटात अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महाराष्ट्र हायस्कूलचा २-० ने पराभव केला. विजेत्या संघात अदिती मस्के, रिया गवळी, संचिता पाटील, श्रावणी हिप्परगे, तनिष्का पाटील, ऋत्वी पाटील, साक्षी हवलदार, विविका कदम, समृद्धी कोळी, समृद्धी भोसले यांचा समावेश होता. त्यांना प्रशिक्षक प्रा. संतोष कुंडले, प्रा. सांद मुजावर, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

१९ वर्षे मुलांच्या गटात अंतिम सामन्यात विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा २-० ने पराभव केला.